निशाणी क्र.२६ /क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

| | |
|---|---|
| माझे नाव | - सरीता महेश परदेशी, |
| वय | - ४८ वर्षे, |
| हुद्दा | - म.पो.ह., ब.नं. ६५, |
| नेमणूक | - खोपोली पोलिस स्टेशन. |

**सरतपास सरकारी वकील श्रीमती पी. टी. बुये यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१) मी खोपोली पोलीस स्टेशन येथे सन २०२४ पासून कार्यरत आहे. दि. ०२/०९/२०२४ रोजी फि**निशाणी २७** र्यादी योगिता प्रणीत पाटील यांनी दिलेली फिर्याद मी ठाणे अंमलदार असल्याने गु.र.क्र. २६५/२०२४ नुसार नोंद करुन घेतली. सदर फिर्यादीने अशी फिर्याद दिली होती की, दि. ०१/०९/२०२४ व दि. ०२/०९/२०२४ रोजी सकाळी ०९:०० वा. च्या दरम्यान ढेकु येथुन शीळफाटा येथे फिर्यादी त्यांच्या कामावर जाण्याकरीता येत असताना आरोपीने त्याच्याकडील मोटरसायकल वरुन येवून फिर्यादी जात असलेल्या ठिकाणी येवून तुमको मै शीळफाटे पर छोडू क्या असे बोलून फिर्यादीने त्यास नकार दिल्याने फिर्यादीच्या रिक्षाचा पाठलाग करुन तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले अशी फिर्याद दिली होती. त्यानंतर सदरची फिर्याद माझ्याकडे वरीष्ठांच्या तोंडी आदेशाने तपासकामी देण्यात आली. तपासादरम्यान मी दि. ०२/०९/२०२४ रोजी आरोपीला समजपत्र दिले. आता मला दाखविण्यात आलेले समजपत्र तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. समजपत्रास **निशाणी २७** देण्यात आली. त्यानंतर मी दि. ०३/०९/२०२४ रोजी दोन पंचांसमक्ष आरोपीने गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल जप्त केली. आता मला दाखविण्यात आलेला निशाणी १० वरील जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्याच्यावेळी पोलीस हवालदार रुपनवर यांनी फोटो काढला होता. आता मला दाखविण्यात आलेला फोटो तोच आहे. त्यानंतर मी पोलीस हवालदार रुपनवर यांचे ६५-ब नुसारचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले.

त्यानंतर मी जप्त मुद्देमाल पावतीने पोलीस स्टेशन मध्ये जमा केला. आता मला दाखविण्यात आलेली मुद्देमाल पावती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुद्देमाल पावतीस **निशाणी २८** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. मी केलेल्या एकंदरीत तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करुन तिच्या मनात लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन केले त्यामुळे मी त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र पाठविले. आरोपीला पाहील्यास ओळखू शकते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. टी. वाडेकर यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, मी या प्रकरणात घटनास्थळाचा पंचनामा केलेला नाही. मी तपासकामी घटनास्थळावर गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे गजबजलेले ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या आजुबाजूला साक्षीदार यांचे दुकान किंवा हॉटेल आहेत हे दाखवणारा कोणताही हात नकाशा मी केसच्या कामी काढलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, या प्रकरणातील सर्व साक्षीदार फिर्यादीच्या तसेच फिर्यादीचा दिर यांच्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ढेकू गावातून शीळफाट्याकडे जाण्यासाठी एकच रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी ढेकू गावात राहणारा आहे. मी आरोपी ढेकू गावातून शीळफाट्याकडे दररोज कामासाठी येतो याबाबत चौकशी केली नाही. मी आरोपीला तो कोठे नोकरी करतो याबाबत विचारले असता तो काही उत्तर देत नाही याबाबत मी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०३/०९/२०२४ रोजी फिर्यादी सोबत काही अनुचित प्रकार घडल्याबाबत फिर्यादीने पुरवणी जबाब दिला नव्हता. मी रिक्षा चालकाचा जबाब नोंदवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी फिर्याद बसलेल्या रिक्षाचा पाठलाग करत असताना तो तीला इशारे करत होते किंवा शीळफाट्यावर पोहोचल्यावर आरोपीने फिर्यादीला थांबवले व तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला असे काही झाले नव्हते. मी तपासादरम्यान आरोपीचा मोबाईल नंबर घेतला होता. हे म्हणणे खरे आहे की,

घटनेच्या कालावधी मध्ये फिर्यादी सांगत असलेल्या ठिकाणी आरोपी होता हे तपासण्यासाठी मी आरोपीच्या मोबाईलचे कोणतेही लोकेशन काढलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा पंचनामा केसच्या कामी महत्वाचा पुरावा असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी मोटरसायकल क्रमांक एम.एच. ०४ डी.एल. १०४० या गाडीची मालकी दाखविणारे कागदपत्र दोषारोप पत्रासोबत दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गाडीचा नंबर, चेसीस नंबर व इंजिन नंबर यावरुन गाडी मालकाची माहिती आर.टी.ओ. ऑफिस मधुन काढता येते. हे म्हणणे खरे आहे की, गाडी मालकाने त्याची गाडी आरोपीला वापरण्यासाठी दिली होती असा कोणताही जबाब मी या केसच्या कामी नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची गाडी गाडी मालकाच्या ताब्यात दिल्याचा कोणताही कागदोपत्री पुरावा दोषारोप पत्रासोबत दाखल नाही. मी घटनास्थळाच्या आजुबाजूला असलेल्या दुकानांचे सीसीटीव्ही कॅमेरे तपासले नव्हते. साक्षीदार स्वतःहून सांगते की, तेथे सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते. फिर्यादीने फिर्याद देते वेळी मी रिक्षा स्टॉप वर जाण्यापूर्वी आरोपी रिक्षा स्टॉपवर येवून थांबला होता हा मजकूर सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही पाठलाग फिर्यादीचा केलेला नाही. साक्षीदार प्रथमेश पाटील यांनी त्यांचा जबाब नोंदवतेवेळी दि. ०२/०९/२०२४ रोजी फिर्यादीने मला फोन करुन आरोपी तिचा पाठलाग करीत असल्याचे सांगितले होते, त्यानंतर मी रिक्षा चालकाशी बोलून जोपर्यंत आरोपी पाठलाग करतो तोपर्यंत फिर्यादी सोबत रहा असे सांगितले होते, त्यानंतर आरोपी शीळफाट्यावरुन गायब झाला होता हा मजकूर सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने देखील फिर्याद देतेवेळी प्रथमेश पाटील याला तिने फोन करुन आरोपी तिचा पाठलाग करत असल्याचे सांगितल्याचे सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अजित सुरेश जाधव हा घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, अजित सुरेश जाधव याच्या समक्ष फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये कोणतेही संभाषण झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने फिर्याद देतेवेळी आरोपीचे नाव व पत्ता सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला कोणतीही नोटीस दिलेली नाही. मी आरोपीला नोटीस देतेवेळी स्टेशन डायरीला नोंद केली नव्हती. मी फोटो काढतेवेळी पोलीस हवालदार रुपनवर यांच्याकडे त्यांच्या मालकीचा मोबाईल होता हे दाखविण्यासाठी

मोबाईलचे बील दोषारो पत्रासोबत दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस हवालदार रुपनवर यांनी जांभुळपाडा पोलीस दुरक्षेत्र येथे जावून कोणत्याही फोटोंची प्रिंट काढली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगते की, टायपिंग मिस्टेक झालेली आहे. मी पोलीस हवालदार रुपनवर यांचा मिस्टेक झाल्याबाबत स्वतंत्र जबाब नोंदवलेला नाही. मी पोलीस हवालदार रुपनवर यांनी फोटो काढण्याचे शासकीय प्रमाणपत्र घेतल्याबाबत कोणतेही कागदपत्र दोषारोप पत्रासोबत दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ वरील फोटो जी.पी.एस. मॅप कॅमेरा मार्फत घेण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ वरील फोटो आम्ही पंचनामा सुरु असतेवेळी काढलेला आहे. पंचनाम्याच्याकामी पोलीस हवालदार रुपनवर यांना पोलीस स्टेशन आवारात घेवून जात असल्याबाबतची नोंद मी पोलीस स्टेशनला नोंद केली नव्हती. गुन्ह्याच्या कामी मी घटनास्थळावर चौकशीसाठी गेले होते याबाबची नोंद मी स्टेशन डायरीला केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर गेले होते तसेच पोलीस हवालदार रुपनवर पंचनाम्याच्यावेळी हजर होते हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा मी दोषारोप पत्रासोबत दाखल केलेला नाही. मी कोणतीही नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताही गाडीचा पंचनामा केलेला नाही. सदरची गाडी सध्या मुद्देमाल कक्षात आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने फिर्याद गैर समजुतीतून दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करुन चुकीचे दोषारोप पत्र पाठवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.03.12 17:55:03 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - १२/०३/२०२६